डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली,जि.रत्नागिरी.

जा.क्र./मसकें/प्रअवा/170/723/२०२२.

दिनांक 19 JAN 2023

# जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग या प्रक्षेत्रावरील WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजनेतील झाडी–झुडूपे तोडणे व तोडलेली झाडी –झुडूपे एकत्र गोळा करणे हे काम करणे नियोजित आहे. सदर नियोजित काम हे दिनांक ०६/०२/२०२२ ते २२/०३/२०२३ या कालावधीत ठेका पध्दतीने करावयाचे आहे. कामाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल<br>• WMS आंबा टेकडी क्षेत्रः– १ हेक्टर क्षेत्र (१०० झाडे)<br>• फळबाग लागवड योजना क्षेत्रः–२ हेक्टर क्षेत्र (२५० झाडे)<br>• एकूण क्षेत्रः–३ हेक्टर |
|---|---|
| १) | WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजना एकूण क्षेत्र ३ हेक्टर मधील जंगली झाडी–झुडूपे तोडणे. |
| २) | तोडलेली झाडी–झुडूपे एकत्र गोळा करून ठेवणे. |

वरीलप्रमाणे कामे ठेका पध्दतीने दिनांक ०६/०२/२०२३ ते २२/०३/२०२३ या कालावधीत करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाच्या दरपत्रकामध्ये होणा–या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांकः ३०/०१/२०२३, पर्यत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा–या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजना झाडी–झुडूपे तोडणे व तोडलेली झाडी झुडूपे एकत्र गोळा करणे ही कामे ठेका पध्दतीने करणे."** असा उल्लेख करावा, लिफाफा वंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा–या विलंबास हे कार्यालय जबावदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून संमतीपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्यामध्येच सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

• **उपरोक्त कामाच्या अटी व शर्तीः–**

१) ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहुनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजुरी आदेश प्राप्त होताच मंजुरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनानुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

(PTO)

Scanned by CamScanner

३) प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतकडे जमा करावयाचे आहे.

४) ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढिल ठेक्याच्या वेळी गृहित धरला जाणार नाही. ठेक्याबाबत करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५) ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्यांचे बॅंक खाती **NEFT/RTGS** धनाकर्षादवारे करण्यात येईल.

६) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यासंबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

७) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत व सुलकरण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

८) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

९) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेकाकालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१०)ज्याकंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू. १००/— बॉण्ड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

११) शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

**सोबत:—दरपत्रक मसुदा**

(डॉ० एस० जी० महाडिक)
संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड

Scanned by CamScanner

श्री/ श्रीमती .
मु.पो. ता.
जि.रत्नागिरी.
दि.

प्रति.

मा. संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
(वाकवली विभाग)

**विषय ः वाकवली प्रक्षेत्र विभागामधील WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजनेतील झाडी—झुडूपे तोडणे व तोडलेली झाडी—झुडूपे एकत्र गोळा करणे ही कामे ठेका पध्दतीने करण्याच्या दरपत्रकाबाबत...**

**संदर्भः— आपल्या कार्यालयाची जाहिर नोटिस जा.क्र.मसंकें/प्रअवा/ / २०२३, दि.**

महाशय,

वरील विषयान्वये मी आपणास कळवू इच्छिते/इच्छितो की, मी आपल्या मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली प्रक्षेत्र विभागामधील WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजनेतील झाडी—झुडूपे तोडणे व तोडलेली झाडी—झुडूपे एकत्र गोळा करणे ही कामे ठेका पध्दतीने दिनांक ०६/०२/२०२३ ते २२/०३/२०२३ या कालावधीत आपल्या अधिका-यांच्या सुचनेनुसार आपल्या अटी/शर्तीस अधीन राहून करावयास तयार आहे. मी प्रक्षेत्रावरील कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहीले आहे. सदर कामांसाठी मी खालील प्रमाणे माझे दरपत्रक सादर करीत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल<br>**•WMS आंबा टेकडी क्षेत्रः—१ हे.क्षेत्र (१०० झाडे)**<br>**•फळबाग लागवड योजना क्षेत्रः—२ हे.क्षेत्र (२५० झाडे)**<br>**• एकूण क्षेत्रः—३ हेक्टर** | आवश्यक परिमाण व मजुर युनिट | प्रति नग दर व युनिट दर | मजुरी खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १) | WMS आंबा टेकडी व फळबाग लागवड योजना एकूण क्षेत्र ३ हेक्टर मधील जंगली झाडी—झुडूपे तोडणे. | | | |
| २) | तोडलेली झाडी—झुडूपे एकत्र गोळा करून ठेवणे. | | | |
| | **एकुण** | | | |
| (रूपयेः— ............/— प्रति मजुर/दिन या प्रमाणे मजुरी खर्च) | | | | |

वरील संदर्भानुसार जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सर्व अटी अ.क्र.०१ ते ११ नुसार काम करण्यास मी तयार आहे. तरी माझे दरपत्रक मंजुर करून मला संबंधीत कामाचा ठेका मला मिळावा ही विनंती.

**सोबतः—** आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत.

आपला विश्वासू

दिनांकः—

ठिकाणः—

नावः—

पत्ताः—

भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रः—

Scanned by CamScanner